|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव )

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**जा.क्र.कबचौउमवि/7-अ/5242/2018** **दिनांक 12/12/2018**

## तातडीचे/कालमर्यादित (स्मरणपत्र-2)

प्रति,

1) **कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तथा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.**
2) **कबचौउमवितील सर्व प्रशाळा/विभागांचे मा.संचालक/विभागप्रमुख.**

**विषय:- विहीत प्रपत्रातील माहिती त्वरीत सादर करणेबाबत..........**

संदर्भ:-1) शासन निर्णय क्र.एससीवाय-2018/प्र.क्र.89/म-7, दिनांक 23.10.2018.
2) मा. जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल शाखा), जळगांव यांचे पत्र क्र.जमीन/1/कावि/2018/ 33/16/1287, दिनांक 26.10.2018.
3) मा.सहसंचालक, उ.शि., जळगांव विभाग, जळगांव यांचेकडील पत्र क्र.उशि/जविज/डीबीटी/2018-19/3384, दिनांक 29.10.2018
4) मा.शिक्षण संचालक,उ.शि., पुणे यांचेकडील पत्र क्र.उशिसं.2018/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/18690, दिनांक 05.11.2018.
5) मा.सहसंचालक, उ.शि., जळगांव विभाग, जळगांव यांचेकडील पत्र क्र.ससंउशि/शिष्य/दुष्काळ सदृश्य परिक्षा.शु.मा.बा/2018-19/3608, दिनांक 19.11.2018.
6) विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/7-अ/5026/2018, दिनांक 20/11/2018.
7) विद्यापीठाचे स्मरणपत्र क्र. उमवि/7-अ/5143/2018, दिनांक 04/12/2018.

महोदय/महोदया,

वरील संदर्भिय पत्र तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, सन 2018-19 च्या खरीप हंगामात Trigger-2 लागू झालेल्या तालुक्यामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत सूचित करण्यांत आले आहे.

शासनाच्या संदर्भिय क्र.01 च्या शासन निर्णयात मंजूर करावयाच्या सवलतींपैकी अ.क्र. 5 मध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संपूर्ण परीक्षा शुल्कात माफीबाबत सवलत लागू केली असून, त्यासंदर्भात विद्यापीठ स्तरावर लवकरात लवकर पुढील कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्यामुळे विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र. 06 अन्वये विहीत केलेल्या विवरणपत्रात rppatil@nmu.ac.in या mail I.D. वर तात्काळ माहिती पाठवून त्याची हार्ड कॉपी, गुरुवार, दिनांक 29.11.2018 पावेतो पोहोचेल अशा बेताने निम्नस्वाक्षरीकर्ता यांचे कार्यालयास सादर करावी, असे कळविण्यांत आले होते. तद्नंतर संदर्भिय पत्र क्र.07 च्या स्मरणपत्रान्वये सदर माहिती सादर करणेबाबत दिनांक 10.12.2018 पावेतो मुदतवाढ देण्यांत आली होती. तथापि, अद्यापही ब-याच महाविद्यालयांची/परिसंस्थांची/विद्यापीठ प्रशाळा/विभागांकडून माहिती अप्राप्त आहे. **तरी विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र.06 मध्ये सूचित केल्यानुसार सदरची माहिती दिनांक 14.12.2018 पर्यंत माहिती पाठविण्यांत यावी, ही पुन:श्च विनंती.**

**सदरची माहिती दिनांक 14.12.2018 पावेतो प्राप्त न झाल्यास व माहिती अभावी काही अडचण उद्भवल्यास, तसेच संबंधित विद्यार्थी सदर सवलतीपासून वंचित राहिल्यास, त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.**

कळावे,

आपला विश्वासू,

Sd/xxx

**(बी. पी. पाटील)**

संचालक. परीक्षा व मल्यमापन मंडळ